J. D. M. V. P. Co. Op. Samaj's
Shri S. S. Patil Arts, Shri Bhausaheb T. T. Salunkhe Commerce and
Shri G. R. Pandit Science, College, Jalgaon

# Program organized by N. S. S. in Academic Year 2019-20

| Sr. No. | Event | Date | No. of student participated |
|---|---|---|---|
| 1 | International Yoga day | 21/06/2019 | |
| 2 | Debating Competition | 14/12/2019 | 11 |
| 3 | Poster Competition | 05/09/2019 | 17 |
| 4 | Rangoli Competition | 05/09/2019 | 05 |
| 5 | Nirmalya sankalan | 12/052019 | 59 |
| 6 | Swachhata Abhiyan | 02/102019 | 43 |
| 7 | Swachhata Hich Seva | 14/10/2019 | 59 |

# N. S. S Student participation in Academic Year 2019-20

| Sr. No. | Event | Place | Date | No. of student participated |
|---|---|---|---|---|
| **1** | **Jalyukt Shivar** | **KBC NMU Jalgaon** | **21/05/2019 to 25/05/2019** | **03** |
| **2** | **Avhan -2019** | **Nanded University** | **03/06/2019 to 12/09/2018** | **03** |
| **3** | **Yog Shibir** | **KBC NMU Jalgaon** | **22/06/2019** | **06** |
| **4** | **Republic day Pared** | **M.J. College Jalgaon** | **12/09/2019 to 13/09/2019** | **02** |
| **5** | **Ruksha Dindi** | **Jalgaon City** | **03/10/2019** | **02** |

# Program organized by N. S. S. in Academic Year 2019-20

**Report of 5th international yoga day celebration**

International yoga day was celebrated in the college campus. A function was arranged under the guidance of Yoga expert Prof. Balasaheb Suryawanshi, who initially taken *Onkar jap*, various forms of *Pranayam* and various *Asans* like *Mayuraasan, Hasayasan*, *Bhugangaasan*, *Karnasan*. At this occasion all faculty members, non-teaching staff and citizens from surrounding area was present.





Debating competition organized by N. S. S. and Red Ribin Department






AIDS awareness Rangoli competitionorganized by N.. S. S. and Red Ribin Department



AIDS awareness Poster Competition organized by N. S. S. and Red Ribin Department









Program organized under Swachha  Baharat Abhiyan Organized by N. S. S.








अधिकृत विक्रेता :सांघवी पाईप कॉर्पोरेशन, जळगाव
फोन नं. : ०२५७-२२३२६४१
नवीन Nokia 2.1
दोन दिवस चालेल बॅटरी!
2018.09.25 12:34

College

ज.जि.म.वि.प्र.सह. समाजाचे
श्री सा. स. पाटिल कला, श्री भाऊसाहेब टि. टि. साळूंखे
वाणिज्य आणि श्री जी. आर. पंडीत विज्ञान महाविद्यालय,
(नूतन मराठा महाविद्यालय) जळगाव.- ४२५००१

# रेड रिबीन क्लब अहवाल २०१९-२०२०

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जाक्र. कबचौउमवि/१४ख/रासेयो/रेड रिबीन-४०/१०५/२०१९ दि. ०४/०७/२०१९ च्या ई पत्रानुसार महाविद्यालयत पाच रासेयो स्वयंसेवक व पाच रासेयो स्वयंसेविका यांचा रेडरिबीन क्लब खालीलप्रमाणे स्थापन करण्यात आला.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पाटील समृद्धी जीवनसिंग | T.Y.B.Sc (Physics) | 7218194277 |
| २ | सोनकूळ काजल विकास | T.Y.B.Sc (Math) | 9172386224 |
| ३ | साळुंखे कामिनी कैलास | T.Y.B.Sc (Physics) | 9373092577 |
| ४ | शेंडे पुजा चंद्रकांत | T.Y.B.Sc (Math) | 9561715875 |
| ५ | पाटील चैताली लक्ष्मण | T.Y.B.Sc (Physics) | 9860505022 |
| ६ | पाटील पंकज ईश्वर | T.Y.B.A (Sociology) | 9763984212 |
| ७ | पाटील पवन शिवाजी | T.Y.B.Sc (Botany) | 7796035111 |
| ८ | पाटील पृथ्वीराज रविंद्र | S.Y.B.A (Sociology) | 7720804878 |
| ९ | साळुंखे जयेश भास्कर | S. Y. B. Sc | 9975125715 |
| १० | इंगळे मयूर लक्ष्मण | S. Y. B. Com | 9765039102 |

सदर रेडरिबीन क्लबचे उद्घाटन दिनांक ५ सप्टेंबर २०१९ रोजी डॉ. संजय पहूरकर, मनीषा वानखेडे, रुपाली दिक्षीत, उज्ज्वला पगारे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

दिनांक ५ सप्टेंबर २०१९ रोजी रांगोळी व पोस्टर स्पर्धा घेण्यात आली त्यात रांगोळी मध्ये ५ विद्यार्थी व विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला. तसेच पोस्टर स्पर्धेत एकूण १७ विद्यार्थी व विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला. सदर स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे आहे.

रांगोळी स्पर्धा - प्रथम क्रमांक --- पूजा चंद्रकांत शेंडे (T.Y.B.Sc)

पोस्टर स्पर्धा - प्रथम क्रमांक --- पवन शिवाजी पाटील (T.Y.B.Sc)

द्वितीय क्रमांक --- पंकज रोहिदास धनगर (S.Y.B.Sc)

दिनांक १ डिसेंबर २०१९ रोजी जागतिक एड्स दिनानिमित महाराष्ट्र शासन, जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगाव यांनी सर्वसाधारण जनता व युवा वर्गामध्ये एचआयव्ही/एड्स विषसी व्यापक जनजागृती करण्याच्या हेतूने प्रभातफेरी व पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगाव यांच्या आवारात करण्यात आले होते. त्यात महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थी विद्यार्थींनींनी सहभाग घेतला. सदर प्रभातफेरी जिल्हा रुग्णालय- आर. आर. शाळा - एसबीआय - नवीन बस स्टॅण्ड - स्वातंत्र्य चौक - पांडे डेअरी चौक - जिल्हा रुग्णालय या मार्गाने काढण्यात आले होते.

दिनांक १४ डिसेंबर २०१९ रोजी रेड रिबीन क्लब अंतर्गत वकृत्व स्पर्धा घेण्यात आली सदर स्पर्धेत एकूण ११ विद्यार्थी/ विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून रुपाली दिक्षीत, मनीषा वानखेडे समुपदेशक तसेच महानगरपालिकेच्या दिपाली पाटील व प्रतिभा चौधरी यांनी काम पाहिले. या स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे आहे.

| क्रमांक | नाव | वर्ग व रोल नंबर | फोन नंबर |
|---|---|---|---|
| १ | पल्लवी जगन्नाथ शिंपी | M.Com II 82 | 8421360164 |
| २ | हर्षल ईश्वर कोळी | F.Y.BSc 72 | 9325350990 |
| ३ | रितेश प्रदीप पवार | T.Y.B.A 13 | 7020273707 |
| उत्तेजनार्थ | मुकेश प्रकाश सावकारे | T.Y.B.Sc 18 | 9552006825 |

कार्यक्रम अधिकारी

डॉ.वाय.पी.पाटील

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
ज.जि.म.वि.प्र.सह.समाजाचे
श्री.सा.स.पाटील कला,श्री भाऊसो.टी.टी.
साळुंखे वाणिज्य आणि श्री जी.आर.पंडीत
विज्ञान महाविद्यालय,(नुतन मराठा)जळगाव

प्राचार्य

डॉ.एल.पी.देशमुख

PRINCIPAL
Shri S. S. Patil Arts, Shri Bhausaheb T. T. Salunkhe
Commerce & Shri G. R. Pandit Science College Jalgaon.

ज.जि.म.वि.प्र.सह. समाजाचे
**श्री सा. स. पाटिल कला, श्री भाऊसाहेब टि. टि. साळूंखे वाणिज्य आणि श्री जी. आर. पंडीत विज्ञान महाविद्यालय, (नूतन मराठा महाविद्यालय) जळगाव.- ४२५००१**

---

# राष्ट्रीय सेवा योजना

## (नियमित अहवाल २०१९-२०)

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने निर्धारित केलेल्या संख्येनुसार महाविद्यालयतील २५० विद्यार्थी/विद्यार्थीनींना राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेश देण्यात आला. प्रवेशित विद्यार्थी हे सर्व विद्या शाखेशी संबधित आहेत. विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी एक दिवशीय शिबाराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात सर्व विद्यार्थ्यांनी स्वत:चा परीचय करुन दिला. या कार्यक्रमामध्ये रासेयोचे सामाजिक जीवनातील महत्तव व शैक्षणिक फायदे काय आहेत तसेच वर्षभरातील विविध शिबारांची रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. वाय. पी. पाटील यांनी माहिती दिली. अश्या प्रकारे रासेयो स्वयंसेवक निवडीची प्रकिया पूर्ण करण्यात आली.

दिनांक २१ ते २५ मे २०१९ या कालावधीत कबचौ उमवि, जळगाव व सेवा वर्धिनी संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यापीठ स्तरीय जलसंजीवनी श्रमदान शिबीरात निलेश संजय पाटील, चंद्रकांत गजानन पाटील, जयेश प्रभाकर साळुंके यांनी सहभाग घेऊन विद्यापीठ परीसर जलयुक्त करण्यासाठी भरीव योगदान दिले.

दिनांक ३ जुन ते १२ जुन २०१९ या कालावधीत स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे झालेल्या 'आव्हान २०१९' या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीरात जयेश भास्कर साळुंके, कु. हेमलता शिवाजी पाटील व निलेश संजय पाटील यांनी सहभाग घेतला.

दिनांक २२ जुन २०१९ रोजी कबचौउमवि येथे झालेल्या विद्यापीठस्तरीय योगा दिवसाच्या कार्यक्रमामध्ये जयेश भास्कर साळुंके, मनीष दत्तू ठाकूर, मयूर लक्ष्मण इंगळे, निलेश संजय पाटील, पुष्पराज शरद पाटील व शिवाजी सुनील पाटील या स्वयंसेवकांनी भाग घेतला.

दिनांक ११ जुलै २०१९ रोजी सकाळी १०.३० वाजता तंबाखु व्यसनापासून परावृत्त राहण्यासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थीना सामूहिक शपथ देण्यात आली.

दिनांक १५ ऑगस्ट २०१९ रोजी झेंडावंदनाच्या कार्यक्रमाच्या वेळेस उपस्थितांना प्रमुख पाहुण्यांचे हस्ते तंबाखु मुक्तीची सामुहिक शपथ देण्यात आली.

दिनांक २९ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०१९ या कालावधीत कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील दत्तक गावामध्ये कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या सहकार्यातून पुर्नवसन व आपत्ती व्यवस्थापन कार्यासाठी जयेश भास्कर साळुंके याने सहभाग घेतला.

दिनांक १२ सप्टेंबर २०१९ रोजी मेहरुण तलावावर गणपती विर्सजनाच्या वेळी जळगाव शहर महानगरपालिकाच्या सहकार्याने निर्माल्य संकलन मोहिम गणेश घाटावर सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत राबविण्यात आली या प्रसंगी ५९ स्वयंसेवक/स्वयंसेविका उपस्थित होते.

दिनांक १२ ते १३ सप्टेंबर २०१९ या कालावधीत मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव येथे आयोजित पूर्व राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन चाचणी निवड प्रक्रिया शिबीरामध्ये जयेश भास्कर साळुंके व हेमलता शिवाजी पाटील यांनी सहभाग घेतला.

दिनांक १४ ते १६ सप्टेंबर २०१९ या कालावधीत रासेयो कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन व रासेयो डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे झालेल्या राज्यस्तरीय/राष्ट्रीय संचलन पूर्व राज्यस्तरीय रासेयो स्वयंसेवक निवड चाचणीमध्ये जयेश भास्कर साळुंके या स्वयंसेवकाने सक्रीय भाग घेतला.

महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकांनी दिनांक २ ऑक्टोबर २०१९ रोजी दत्तक घेतलेल्या धानवड ता.जि. जळगाव गावास भेट दिली. या वेळी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच नाना पाटील व कार्यक्रम अधिकारी डॉ. वाय. पी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर स्वयंसेवकांनी गावात स्वच्छता रॅली काढून व घरोघरी जाऊन प्लॅस्टिक संकलन केले. तसेच गावामध्ये मतदान जागृती करण्यात आली. शेवटी सर्व गावकऱ्यांसोबत तंबाखूमुक्ती अभियान अंतर्गत तंबाखू न खाण्याची व ग्राम स्वच्छतेची शपथ देण्यात आली.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त दिनांक २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०१९ दरम्यान “स्वच्छता हिच सेवा” मोहिम राबविण्यात आली. त्या अंतर्गत दि. १४ ऑक्टोबर २०१९ या दिवशी सकाळी १० ते १२ या वेळेत ५९ स्वयंसेवकांनी जळगाव नवीन बस स्थानकाची स्वच्छता केली.

दिनांक ३ ऑक्टोबर २०१९ रोजी विद्यार्थी साहित्य संमेलन ग्रंथ दिंडीमध्ये काव्यरत्नावली चौक ते मु.जे. महाविद्यालय जळगाव एकूण आठ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व मा. राज्यसंपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग मुंबई यांचे पत्रान्वये दिनांक २१ ऑक्टोबर २०१९ रोजी झालेल्या महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकच्या वेळी धनराज प्रताप पाटील (धार) व चंद्रकांत गजानन पाटील (दोनगाव बुद्रूक) ता. धरणगाव जि. जळगाव या मतदान केंद्रावर अपंग मतदारांना मतदान करण्यासाठी स्वयंसेवकांनी मदत केली.

दिनांक ३१ ऑक्टोबर २०१९ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमापूजन नुतन मराठा हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री प्रकाश खैरनार, केंद्र प्रमुख अशोक सैंदाणे यांनी केले. स्वयंसेवक/स्वंयसेविका यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती.

दिनांक २६ नोव्हेंबर २०१९ रोजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे संविधान दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात संविधानाच्या उद्देशिकेचे व भारतीय नागरिकांची मुलभुत कर्तव्ये यांचे वाचन कार्यक्रम अधिकारी डॉ.वाय.पी.पाटील व उपस्थित सर्व स्वयंसेवकांनी केले. त्यांनंतर “संविधानातील भारत साकारु या” या विषयावर डॉ.वाय.पी.पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.एल.पी.देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमासाठी निलेश पाटील, पंकज पाटील, जयेश साळुंके यांनी मदत केली. यावेळी रासेयोचे स्वयंसेवक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

दिनांक १ डिसेंबर २०१९ रोजी जागतिक एड्स दिनानिमित्त महाराष्ट्र शासन, जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगाव यांनी सर्वसाधारण जनता व युवा वर्गामध्ये

एचआयव्ही/एड्स विषसी व्यापक जनजागृती करण्याच्या हेतूने प्रभातफेरी व पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगाव यांच्या आवारात करण्यात आले होते. त्यात महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थी विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. सदर प्रभातफेरी जिल्हा रुग्णालय- आर. आर. शाळा - एसबीआय - नवीन बस स्टॅण्ड - स्वातंत्र्य चौक - पांडे डेअरी चौक - जिल्हा रुग्णालय या मार्गाने काढण्यात आले होते.

शैक्षिणक वर्ष २०१९-२० मधील राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा 'उत्कर्ष २०१९' साठी महाविद्यालयातून पाटील मोहिनी हिरालाल व पाटील महेश ज्ञानेश्वर या विद्यार्थिनी व विद्यार्थ्याने अनुक्रमे संगीत व वकृत्व या कला प्रकारात मंगळवार दि. २१ जानेवारी २०२० रोजी झालेल्या स्पर्धेत सहभाग घेतला.
दिनांक २६ जानेवारी २०२० जिल्हा प्रजासत्ताक दिन शिबीर व पथसंचलनात अभिषेक नरेंद्र सपकाळे या विद्यार्थ्याने मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव येथे दिनांक २१.०१.२०२० ते २६.०१.२०२० या कालावधीत सहभाग घेतला.

कोरोना (कोव्हीड-१९) विषाणू प्रसार रोखण्यासाठी विविध प्रकारचे प्रतिबंधक कार्यक्रम रासेयो विभागातर्फे राबविण्यात आले. यामध्ये स्वयंसेवकांनी आपल्या मोबाईलमध्ये आरोग्य सेतू ॲप डाउनलोड केले तसेच आपल्या शेजारी / गावातील व्यक्तींच्या मोबाईल मध्ये सदर ॲप डाउनलोड करण्यात मदत केली. स्वयंसेवकांनी फेस मास्क तयार करून वाटप केले. तसेच गावातील रेशन दुकानात जाऊन गरीब लोकांना गहू, तांदूळ वाटप करण्यात मदत केली. सोशल मिडियाद्वारे जनजागृती करण्यात आली. आपल्या आजुबाजूचा परीसर फवारणी / निर्जंतुकीकरण करण्यात मदत केली वरील सर्व उपक्रम राबवितांना सोशल डिस्टसिंगचे नियमांचे पालन करण्यात आले.

कार्यक्रम अधिकारी
डॉ.वाय.पी.पाटील

प्राचार्य
डॉ.एल.पी.देशमुख